भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६९६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०८/१०/२०१७

१) बंडीच्या उभारीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०६/१०/२०१७ चे २१.०० ते २३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी देविदास मारुती शेंडे वय ३५र्ह्ष, रा. घरतोडा हा जेवन करुन गावातील चौकात आला असता व 'देविचे वर्गनीचे पैसे खाल्ले' अशी चर्चा चालु असतांनी फिर्यादीने कोणी पैसे खाल्ले असे विचारले असता यातील आरोपीने अचानक येवुन बंडीच्या उभारीने फिर्यादीच्या डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादींचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊईके पो.स्टे लाखांदुर हे करीत आहेत.

२) क्षुल्लक कारणावरुन भांडण करुन काठीने डोक्यावर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०६/१०/२०१७ चे २१.३० वाजता दरम्यान यातील आरोपी हा फिर्यादी धनराज चिंतामन भोवते वय ६० वर्ष, रा. कन्हाळगाव हा फिर्यादीस शिवीगाळ करुन 'बौध्द विहाराची चाबी दे' असे बोलुन फिर्यादी सोबत भांडण करुन फिर्यादीच्या डोक्यावर काठीने मारहान करुन जखमी केल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम ३२४,५०४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कोल्हे पो.स्टे पालांदुर हे करीत आहेत.

३) जनावरे निदर्यतेने डांबुन कोंबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :—

दिनांक ०७/१०/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील ट्रकमध्ये पांढरे ४ गोरे, लाल ०९ गोरे, ०६ पांढऱ्या गायी, लाल गायी २०, काळागोरा ०१, काळी गाय ०१, असे एकुण ४१ जनावरे वैदयकीय प्रमाणपत्र न बाळगता व चाऱ्या पाण्याची व्यवस्था न करता डांबुन कोंबुन निदर्यतेने वाहतुक करतांनी मिळुन आल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ११(१)(ड)(ई) प्रा. नि. वा. का. सहकलम ५(अ)(१) प्रा. सं. का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पो.स्टे कारधा करीत आहेत. आरोपी अटक आहे.

४) संगनमत करुन अन्यायाने घरात प्रवेश करुन लाथा बुक्यांनी मारपीट केली व पाहुन घेण्याची धमकी दिली. :—

दिनांक ०५/१०/२०१७ चे १९.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी याने आरोपी क्र. १ व २ ने 'तुझे माझे आई सोबत अनैतीक संबध आहे' या कारणा वरुन संगनमत करुन फिर्यादीचे घरात अन्यायाने प्रवेश करुन फिर्यादीचे घरात अन्यायाने प्रवेश करुन लाथा बुक्यांनी मारपीट केली व पुढे पाहुण घेण्याची धमकी दिल्याने फिर्यादी बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५२,३२३,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. माहुर्ले पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

५) घरातील सोन्या व चांदी साहित्याची व नगदी पैश्याची चोरी . —

दिनांक ०७/१०/२०१७ चे १३.३० ते १४.०० वाजता दरम्यान यातील कोणीरती अज्ञात चोराने फिर्यादीचे राहते घराचे समोरील दाराचा कोंडा काढुन आत प्रवेश करुन आलमारीत ठेवलेला १ सोन्याचा कंगन ४० ग्रॅम, २ सोन्याच्या अंगठया प्रत्येकी १० ग्रॅम, चांदीचे भांडे ३०० ग्रॅम, नगदी अंदाजे २५,०००/—रु. असा एकुण १,५७,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी अनिल रमेश कारंजेकर वय ५० वर्ष, रा. श्रीराम नगर तुमसर यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५४,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जाधव पो.स्टे तुमसर हे करीत आहेत.

**५) ट्रॅक्टरची चोरी. :—**

दिनांक ०६/१०/२०१७ चे २२.०० ते ०७/१०/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा स्वराज कंपनीचा ट्रॅक्टर क्रमांक एमएच ३६ एल ३६०२ किंमती ३,००,०००/—रु. चा घरा समोर ठेवला असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी सौ. योगीनी सुरेन्द्र भाजीपाले वय ४३ वर्ष, रा. नेहरु वार्ड वरठी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. खोंडे भंडारा पो.स्टे वरठी हे करीत आहेत.

**६) संगनमत करुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन काठीने थापड बुक्यांनी व मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक ०७/१०/२०१७ चे १७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा गावातील अतुल खोब्रागडे याचे पानठेल्यात बसला असता यातील आरोपीतांनी फिर्यादीला पाहुण जुण्या वादा वरुन संगनमत करुन फिर्यादीला काठीने, थापड बुक्यांनी मारुन त्याच्या पत्नी व पोरीला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,३२३,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. भोगे पो.स्टे अडयाळ हे करीत आहेत.

**७) चारचाकी वाहनांच्या धडकेत एक जखमी . :—**

दिनांक ०७/१०/२०१७ चे १५.३० वाजता दरम्यान यातील जखमी राकेश रामचंद्र गभने वय ४६ वर्ष, रा. केसलवाडा वाघ हा सिंधी लाईन येथुन एनएच ६ रोडने पायी जात असता यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन साकोली कडुन भंडारा कडे जात असतांना भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन जखमीस मागेहुन धडक देवुन जखमी करण्यास करणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी अविनाश विजय लांजेवार वय २६ वर्ष, रा. कनेरी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १८४,१३४(ब) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे लाखनी हे करीत आहेत.

**८) अवैध दारू / जुगार अडयावर धाडी . :—**

दिनांक०७/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, तुमसर व गोबरवाही येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०४ गुन्हे दाखल करून ५० लिटर हातभट्टी दारु किंमती ३१००/—रु, तसंच जुगारातुन किंमती १४२०/—रु. असा एकुण ४,५७०/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ०६/१०/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०५, तीन सिटर वाहनांवरती ०९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८२ केसेस करण्यात आले आहे.

08.10.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता